राज्यातील बालमृत्यू व मातामृत्यू कमी करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः लवेसू-२०२३/प्र.क्र.५९१/आरोग्य-७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १५ जूलै, २०२४

वाचा :-

अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य/कक्ष १५क/दिनांक २८.०३.२०२४

प्रस्तावना:-

राज्यात मातामृत्यू व बालमृत्यू कमी करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येतात. सदर उपाययोजनांमुळे परिणामी राज्याचा अर्भक मृत्यूदर १६, बालमृत्यू दर १८, व मातामृत्यू दर ३३ झालेला आहे. यामध्ये सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग सतत प्रयत्नशील आहे. सन २०२३ हिवाळी अधिवेशन, नागपूर येथील लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान मा.मंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी राज्यातील बालमृत्यू व मातामृत्यू कमी करण्यासाठी विचार विनियम करण्यासाठी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने राज्यस्तरावर माता व बालमृत्यू कमी करण्याकरिता मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यस्तरावर माता व बालमृत्यू कमी करण्याकरिता मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याकरिता मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	पदनाम	पद
१.	मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई	अध्यक्ष
२.	मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई	सदस्य
३.	संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई	सदस्य
४.	संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे	सदस्य
५.	अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण, आरोग्य सेवा पुणे	सदस्य
६.	सहसंचालक, कुटुंब कल्याण, आरोग्य सेवा, पुणे	सदस्य
७.	सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये/प्रा.आ.केद्र/उपकेंद्र, मुंबई	सदस्य
८.	उपसंचालक, विलटो, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे	सदस्य
९.	डॉ.आरती किणीकर, बालरोग तज्ञ व विभागप्रमुख- बी.जे.शा.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे	सदस्य
१०.	प्रा.डॉ.राजश्री कटके, स्त्री-रोग तज्ञ, ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई	सदस्य
११.	डॉ.रमेश भोसले, माजी प्राध्यापक व विभागप्रमुख स्त्री-रोग व प्रसुतीशास्त्र विभाग, बैजीशावैम, पुणे	सदस्य
१२.	डॉ.तेहसीन खान, बालरोगतज्ञ, जिल्हा रुग्णालय, पुणे	सदस्य
१३.	डॉ.आरती कुलवाल, स्त्री रोग तज्ञ, सहाय्यक संचालक, वैद्यकीय, अकोला परिमंडळ	सदस्य
१४.	UNICEF/Jhpiego/PATH राज्यस्तरीय प्रतिनिधी	सदस्य
१५.	उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे व नाशिक परिमंडळ	सदस्य
१६.	जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती व पालघर	सदस्य
१७.	जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती व पालघर	सदस्य

उपरोक्त समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील :-

१. उक्त समितीची बैठक दर तीन महिन्यातून एकदा आयोजित करण्यात येईल.

२. बैठकीमध्ये राज्यभरात झालेल्या निवडक बालमृत्यू व निवडक मातामृत्यू यांचा आढावा घेणे.

३. माता आणि नवजात मृत्यूच्या परस्पर संबंध असलेल्या कारणांचा शोध घेऊन सदर मृत्यू टाळण्याकरिता उपाययोजना करणे.

४. प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त तयार करून बैठकीमध्ये घेतलेले महत्वपूर्ण निर्णय, कृती आराखडा व इतिवृत्त संबंधितांना अनुपालनास्तव पाठविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०७१११४४७०७००१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA VITTHAL KUDALE

Digitally signed by RAJENDRA VITTHAL KUDALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=b512f7ff8b758d60a4598c24a36386a4805881cbcea84410a43526338ca5896f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=92FCD41179A2BA99BFFA75CBE0C90685A327C8ACC0593DB3D1CCAD3F24BA6315, cn=RAJENDRA VITTHAL KUDALE
Date: 2024.07.16 15:27:33 +05'30'

(राजेंद्र वि. कुडले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
६. उपसंचालक, विलटो, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
७. अतिरिक्त संचालक,कुटुंब कल्याण राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
८. डॉ.आरती किणीकर, बालरोग तज्ञ व विभागप्रमुख-बी.जे.शा.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे.
९. .डॉ.राजश्री कटके, स्त्री-रोग तज्ञ, ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई प्रधान सचिव, रोजगार हमी योजना, मंत्रालय, मुंबई.
१०. डॉ.रमेश भोसले, माजी प्राध्यापक व विभागप्रमुख स्त्री-रोग व प्रसुतीशास्त्र विभाग, बैजीशावैम, पुणे.
११. डॉ.तेहसीन खान, बालरोगतज्ञ, जिल्हा रुग्णालय, पुणे
१२. डॉ.आरती कुलवाल, स्त्री रोग तज्ञ, सहाय्यक संचालक, वैद्यकीय, अकोला परिमंडळ
१३ सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई.
१४. उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे व नाशिक परिमंडळ

१५. जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती व पालघर
१६. जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती व पालघर
१७. निवडनस्ती (आरोग्य -७) .